**औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाची सोमवार दिनांक २४. १.१९८० रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या ४० व्या विशेष सभेचा कार्यवृत्तांत**

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औरंगाबाद.मंडळ |
| २] | श्री. अ.म.महाजन | उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३] | श्री. मुन्शीलाल गौतम<br>आयुक्त मनपा औरंगाबाद | सदस्य |
| ४] | श्री.द.मो.गोडघाटे<br>उपसंचालक नगर रचना<br>औरंगाबाद. | सदस्य |

सभेच्या प्रारंभी मा.सभापती यांनी खालील प्रमाणे शोकप्रस्ताव मांडला.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी व मिळकत व्यवस्थापक श्री.व्ही.एस.साठे हे कार्यालयीन कामाकरिता दि. १७.७.८ रोजी नांदेड येथे गेले होते. ते त्यादिवशी रात्री एका खाजगी हॉटेलमध्ये मुक्कामाला असतांना रात्री झोपेतच त्यांचे दुःखद निधन झाले. श्री.साठे हे अत्यंत मनमिळावू कार्यतत्पर व कुशल अधिकारी होते.

मंडळाच्या ४० व्या बैठकीच्या प्रारंभी मा.सभापती यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला त्यास उपसभापतींनी दुजोरा दिला. त्यानंतर सर्व सदस्य व अधिकारी यांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. हे मंडळ त्यांच्या कुटूंबीयाच्या दुःखात सहभागी आहे.

शोकप्रस्ताव

श्रीयुत वसंत साठे, मिळकत व्यवस्थापक यांना नांदेड येथे कार्यालयीन कामासाठी गेले असता दिनांक १८.७.१९८९ रोजी देवाज्ञा झाल्यामुळे साठे कुटूंबीयावर कोसळलेल्या ह्या दुःखात औरंगाबाद मंडळाचे सभापती, मंडळाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी वृंद सहभागी आहेत. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

...२..

विषय क्रं. १:- मंडळाच्या दिनांक २६.६.१९८९ रोजी झालेल्या ३९ व्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मा.सभापतींनी अशी सूचना केली की, मंडळाच्या सभेत घेतलेल्या निर्णयावर काय कार्यवाही केली त्यासंबंधीची टिप्पणी मंडळाच्या समोर ठेवावी.

ठराव क्रमांक १८८.

मंडळाच्या दिनांक २६.६.१९८९ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांस मान्यता देण्यांत आली व तो कायम करण्यांत आला.

विषय क्रं. २:- नासिक येथील कॉन्ट्रॅक्टर श्री. डि.बी.बाफना यांची औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना नुकसान भरपाई देणेबाबतची नोटीस.

या बाब टिप्पणीच्या संदर्भात मा.उपसभापती यांनी सविस्तर माहिती मंडळास दिली. मंडळाच्या सदस्यांनी असे मत प्रदर्शित केले की, कर्मचा-यांनी व अधिका-यांनी मंडळाच्या हितासाठी काम केले असल्यामुळे त्यांना संरक्षण द्यावे व वरिष्ठ न्यायालयात अपील करता येईल किंवा नाही हे पहावे. व त्याकरिता कार्यालयातर्फे एक पत्र पाठवून पोलीस अभियोक्ता व सरकारी वकील यांना विचारणा करावी.

ठराव क्रमांक १८९.

चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला की, फौजदारी खटला शासना-विरुध्द श्री. बाफना या प्रकरणाची सद्यस्थीती जाणून घेण्यासाठी पोलिस अभियोक्ता व सरकारी वकील नासिक यांना कार्यालयातर्फे पत्र पाठवावे. मंडळाच्या हितासाठीच कर्मचा-यांनी कारवाई केलेली असल्याने या प्रश्नी मंडळाच्या कर्मचा-याबाबत न्यायालयीन कार्यवाहीसाठी मंडळाने आवश्यक ते सर्व काम मंडळाचेच काम समजून करावे.

..३..

विषय क्रं. ३:- मा. सभापतीच्या वाहनाचे वाहन -चालक श्री. साबरे यांना नांदेड येथे सेवानिवासस्थानाचे वाटप करणे बाबत.

ठराव क्रमांक १९०

चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला की, मा. सभापतीचे वाहन चालक श्री. साबरे यांना नांदेड येथील गाळा क्रं. २४३ हा सेवानिवासस्थान म्हणून वाटप करण्यांत यावा परंतु त्यांनी नांदेड ते कंधार हे घरी जोणे येणे त्यांनी स्वतःचे खर्चाने करावे. याच अटीवर त्यांना नांदेड येथे सेवानिवासस्थान देण्यात मंडळाने मंजूरी दिली.

विषय क्रं. ४:- अल्प उत्पन्न गट योजनेखाली ३३६ गाळयांच्या योजना, औरंगाबाद या योजने अंतर्गत गाळा क्रं. ४७७ सौ. शांताबाई जायवळ यांनी ड्रेनेज लाईन दुरुस्तीसाठी केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत.

ठराव क्रमांक १९१

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, श्रीमती शांताबाई जायवळ यांनी त्यांच्या आविष्कार कॉलनीतील गाळा क्रं. ४७७ च्या ड्रेनेज दुरुस्तीसाठी केलेल्या खर्चापैकी रु. १४०६/- हा खर्च[मालमत्ता व्यवस्थापन विक्री हस्तांतरण व गाळयाची अदला बदल विनियम १९८१ चे परिशिष्ट अट क्रं. २ प्रमाणे देय ठरतो व क्रं. ३ प्रमाणे देय ठरणारी रक्कम अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून प्रमाणीतकरुन नंतरच] अदा करण्याच्या अटीवर मंजूर करित आहे. व ही रक्कम श्रीमती जायवळ यांच्या-कडून गाळयाच्या हप्त्याच्या थकबाकी पोटी वळती करावी. तसेच हे पैसे कंत्राटदाराच्या अंतिम देयकातून कापून घेण्यात यावेत.

विषय क्रं. ५:- मनमाड येथील प्राथमिक शाळेसाठी आरक्षीत भूखंड नगरपरिषद मनमाड यांचेकडे हस्तांतरीत करण्या-बाबत.

या विषयाची सविस्तर माहिती उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना दिली व पुर्वी काढलेली किंमत रु. १,७०,८११/- नगरपरिषदेस कळविण्यांत आली. मुख्य अधिकारी नगर परिषद मनमाड यांनी असे कळविले की,

सदर भूखंड अल्प किंमतीत नगर परिषदेस मिळावा कारण या भूखंडावर आमदार निधीतून शाळा बांधावयाची आहे. याच अनुषंगाने दि. ५.७.८९ रोजी मुख्याधिकारी नगर परिषद मनमाड यांनी या कार्यालयात येऊन वैयक्तीकरित्या चर्चा करून नगरपरिषदेकडे सध्या शाळेच्या भूखंडाच्या किंमती एवढा निधी उपलब्ध नसल्यामुळे पुर्वीच्या किंमतीत गृहीत धरण्यांत आलेले कर जसे की, रजिस्ट्रेशन फी, स्टॅम्प ड्युटी, कन्व्हर्जन चार्जेस, अकृषीक आकारणी इत्यादी, नगरपरिषद भरण्याची जबाबदारी घेईल. हया पोटी येणारी रक्कम, एकूण किंमत रु. १,७०,८११/- मधून कमी केल्यास आजच्या घटकेला मंडळाला जमीनीच्या किंमतीपोटी रु. १,१९,६५६ येणे निघते. अशी माहिती मंडळाच्या सदस्यांना उपसभापतींनी दिली. तसेच हेही स्पष्ट करण्यांत आले की, जेवढी रक्कम कमी दाखविली आहे ती रक्कम मंडळाला भरावी लागली असती पण आता ती रक्कम नगरपरिषद परस्पर त्यांच्याकडे असलेल्या निधीच्या उपलब्धतेप्रमाणे वेळोवेळी भरेल हया व्यवस्थेमुळे मंडळाचे कसल्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही.

श्री. गोडघाटे, उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद हयांनी चर्चेत भाग घेतांना असे सांगितले की, सदर कारणासाठी नगरपरिषदेस नगर रचना विभागामार्फत निधी उपलब्ध होवू शकतो. नगरपरिषद मनमाड हयांनी उपसंचालक, नगर रचना, नासिक हयांचेकडे प्रस्ताव पाठविण्याचा सल्ला त्यांना देण्यात यावा.

<u>ठराव क्रमांक १९२.</u>

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की, नगरपरिषदेने जमिनीच्या किंमतीपोटी रु. १,१९,६५६/- मंडळाकडे भरावे. व उर्वरीत पैसे नगरपरिषद मनमाडनी उपसंचालक नगर रचना नासिक यांच्याकडे मागणी करण्यास हरकत नाही असे पत्र औरंगाबाद मंडळाने नगरपरिषद मनमाड यांना लिहावे व भूखंडाचा उपयोग नगरपरिषदेला प्राथमिक शाळेकरिताच करता येईल. व इतर कर नगरपरिषदेलाच भरावे लागतील या अटीवर ताबा द्यावा. मात्र नगरपरिषदेने रजिस्ट्रेशन फी, स्टॅम्प ड्युटी इत्यादीचा भरणा केल्याशिवाय कागदोपत्री हस्तांतर करणेत येवू नये. अथवा भाडेपट्यामध्ये वरील देयके देण्याची अट घालण्यांत यावी.

विषय क्र. ६:- नोबल एज्युकेशन सोसायटी या संस्थेस लेबर कॉलनी नांदेड येथील मोकळे भूखंड क्र. ११/२३५, ११/२४५ व ११/२४६ देणेबाबत.

याबाबतीत सविस्तर माहिती मा. उपसभापती यांनी सदस्यांना दिली तसेच पूर्वी काढलेली किंमत व तिची पध्दती तसेच आता काढलेली किंमत व त्याचे Calculations ] सदस्यांना समजावून सांगितले. तसेच मा. सभापती यांनी गाळा क्र. १४/२०७ येथे शाळेचेच ऑफिस असल्याने व इतर तीन भूखंड ही शाळेसाठीच संस्थेने मागितलेले असल्याने गाळा क्र. १४/२०७ व तीनही भूखंड संस्थेस द्यावयास हरकत नाही असे मत प्रदर्शित केले.

ठराव क्र. १९३

यावर सविस्तर चर्चा होऊन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार काढलेली किंमत रु. ४६०००/- आणि वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु. ३६८० /- मंजूर करण्यांत आली व संस्थेस रु. ४६०००/- रु. भरुन भूखंड शाळेकरिता वाटप करण्याचे मान्य करण्यांत आले. तसेच गाळा क्र. १४/२०७ हा शाळेकरिताच वापरावयाच्या अटीवर प्राधिकरणाच्या आदेशाप्रमाणे गाळयाची तिप्पट किंमत घेऊन संस्थेस वाटप करावयाचे ठरले. मात्र प्राधिकरणाने सदर गाळा परत घ्यावयाची अट घातल्याने गाळा हस्तांतरणाबाबत प्राधिकरणाची परवानगी घेण्यात यावी असे ठरले.

विषय क्र. ७:- नगरपरिषद क्षेत्रातील गृहनिर्माण योजना.

योजनेच्या अभिन्यास, घराचे नकाशे व अंदाजपत्रके करणेबाबत.

. . .

नगर परिषद क्षेत्रातील गृहनिर्माण योजनेच्या संदर्भात उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना सविस्तर माहिती सांगितली. यावर उपसभापतींनी शासनाच्या दि. २०.२.८[illegible] च्या परिपत्रकाकडे लक्ष वेधले व योजनेचे अंदाजपत्रके, लेआऊट, नकाशे, कर्ज, मिळवून देणे कामे प्राधिकरणाने करावयाची आहे. परंतु यावर उपसभापतींने असे सांगितले की, मंडळाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे वरील काम करणे अशक्य आहे. सबब सदरील कामे मंडळाचे पटलावर असलेल्या खाजगी वास्तुशास्त्रज्ञाकडून करुन घेणे इष्ट होईल. त्यांना करावयाचे अदाईचा खर्च नगरपरिषदेने द्यावा आणि प्रकल्पाचे किंमतीत तो समाविष्ठ करण्यांत यावा. श्री. द. मो. गोडघाटे उपसंचालक यांनी अशी सूचना केली की, नगरपरिषद क्षेत्रातील गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी पुरेसा कर्मचारी शासनाने उपलब्ध करुन द्यावे त्यावर सभापतींनी सांगितले की, यापूर्वी अशा प्रकारचा पत्रव्यवहार शासन व प्राधिकरणाशी झालेला आहे.

ठराव क्रमांक १९४.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की, गेवराई व परतूर येथील गृहनिर्माण योजनेचे अभिन्यास, घराचे नकाशे, अंदाजपत्रके मंडळाच्या पटलावर असलेले व मंडळाने शिफारस केलेल्या खाजगी वास्तुशास्त्रज्ञाकडून करून घ्यावे व त्या कामापोटी दयावयाची रक्कम प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे नगर परिषदेने वास्तुशास्त्रज्ञाना दावी व हा खर्च प्रकल्पाच्या किंमतीत अंतर्भूत करण्यांत यावा.

विषय क्रं. ८:- देवळाली नासिक येथील उच्च उत्पन्न गटातील ६० गाळयांची योजना.

या विषयावर उपसभापती यांनी सविस्तर माहिती दिली. सध्या काम बंद आहे व त्यामुळे मंडळाने केलेल्या गुंतवणूकीवरचे व्याज वाढत आहे. या वाढीव व्याजाचा बोजाही अखेरीस लाभधारकांवरच पडणार आहे. तसेच लाभधारकांकडून अनामत रकमाही मंडळाकडे घेतलेल्या आहेत. व त्यांचीही इच्छा गाळे लवकरात लवकर तयार व्हावे अशीच आहे. या सर्व बाबींचा विचार करून असा निर्णय घेण्यांत आला की, मा. उपसभापतींनी व मुख्य अधिकारी यांनी या सर्व प्रश्नाचा तसेच गुत्तेदाराच्या योग्य अशा [ क्लेमस- च्या ] मागणीचा पुनर्विचार करून मंडळापुढे सविस्तर प्रस्ताव ठेवावा व काम सुरु होईल अशा दिशेने प्रयत्न करावा.

ठराव क्रमांक १९५.

मंडळानी चर्चेअंती असा निर्णय घेतला की, मुख्याधिकारी, औरंगाबाद मंडळ यांनी या प्रकरणी पुनर्तपासणी करून ठेकेदाराच्या मागणीबाबत परिस्थितीजन्य अहवाल सादर करून हा प्रश्न सोडविण्याच्या दिशेने प्रयत्न करावे.

विषय क्रं. ९: कंत्राटदाराच्या अंतिम प्रलंबित देयकावर करावयाची कार्यवाही.

ठराव क्रमांक १९६.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, कंत्राटदाराचे अंतिम प्रलंबीत देयकांचा सविस्तर माहिती मंडळापुढे माहितीसाठी सादर करावी.

मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय.

विषय क्रं. १÷ एन-६ भाग-२ नविन औरंगाबाद येथील मंडळाच्या ८२ गाळे उच्च उत्पन्न गट योजनेस पाणीपुरवठयाचे कनेक्शन महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडून मिळणे बाबत.

ठराव क्रमांक १९७.

चर्चेअंती आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी आश्वासन दिले की, या विषयी योग्य ती कार्यवाही महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठयाची स्थिती बघुन करण्यांत येईल.

विषय क्रं. २:- सर्व्हे क्रं. ५४ गारखेडा औरंगाबाद येथील योजनेस पाणीपुरवठा व्यवस्था करणे बाबत.

या बाब टिप्पणीची संपूर्ण माहिती विषद करण्यांत आली व मंडळाच्या गारखेडा येथील योजनेस पाणीपुरवठा करण्याविषयी आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना सुचविण्यांत आले. यावर आयुक्तांनी सांगितले की, पाणीपुरवठयाची स्थिती बघून योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

ठराव क्रमांक १९८.

मंडळाने अता निर्णय घेतला की, गारखेडा येथील मंडळाच्या योजनेस पाणीपुरवठा करण्याविषयी आयुक्त यांनी त्यांच्या स्तरावर प्रयत्न करावे.

विषय क्रं. ३:- औरंगाबाद मंडळाने सिडको भागातील एन-५ व एन-६ सेक्टरमध्ये बांधलेल्या गाळयांच्या गाळेधारकांना पाणीपुरवठयाचे स्वतंत्र कनेक्शन देणे बाबत.

ठराव क्रमांक १९९.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी एन-५ व एन-६ सेक्टरमध्ये बांधलेल्या गाळयांच्या गाळेधारकांना पाणीपुरवठयाचे स्वतंत्र कनेक्शन देण्याविषयी आयुक्तांना विनंती केली.

ठराव क्रमांक २००.

आयुक्त महानगरपालिका यांनी या संदर्भात कार्यकारी अभियंता श्री. धारुरकर यांच्याशी चर्चा करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तेंव्हा कार्यकारी अभियंता/औरंगाबाद मंडळ यांनी महानगरपालिका

..९..

अभियंत्याकडे हा प्रश्न मंडळातील चर्चेच्या अनुषंगाने सोडविण्याचा प्रयत्न करावा.

सभेचे कामकाज संपल्यानंतर गृहनिर्माण भवनाच्या परिसरात मा. सभापती औरंगाबाद मंडळ/ आयुक्त महानगरपालिका / उपसंचालक नगर रचना औरंगाबाद यांच्या हस्ते वृक्षारोपपाचा कार्यक्रम संपन्न झाला.